पोलीस आयुक्तालय ,अमरावती
दिनांक १७.११.२०२१

## – प्रेस नोट –

दि.१२.११.२०२१ व दि.१३.११.२०२१ रोजी अमरावती शहरामधे दोन समाजामध्ये तेढ निर्माण होवुन जातीय तणाव निर्माण झालेला आहे यामध्ये काही मोर्चेकरांनी बाजारपेठेतील दुकानावर दगडफेक करून तोडफोड केली व दुकानांना ,वाहणांना आग लावुन नुकसान केले. अनियत्रीत जमावाला पांगविण्यासाठी राज्य राखीव पोलीस दल व स्थानिक पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी योग्य बळाचा वापर करून परिस्थितीवर नियत्रंण ठेवले. आंदोलकारी यांना हुसकावुन लावुन मोठया प्रमाणात होणारी हानी आटोक्यात आणली.या आंदोलना दरम्यान काही विकृत लोकांनी सोशल मिडीयावर चुकीचे संदेश प्रसारित केल्याने नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले होते. आंदोलनामध्ये सहभागी झालेल्या आंदोलनकर्त्यां विरूध्द विविध पोलीस स्टेशनमध्ये एकुण ३८ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे.

आज दि.१७.११.२०२१ सदर घटनेबाबत विशेष अभियान राबवुन शहरामध्ये उपद्रप व दंगा करणा–या विविध संघटना व पक्षाचे वरिष्ठ नेत्यांसह एकुण १५ आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे. सदरची कारवाई डॉ.आरती सिह पोलीस आयुक्त अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे. अद्याप २५० आरोपीतांना अटक करण्यात आलेली असुन इतर आरोपींना अटक करण्याची प्रकिया सुरू आहे.

अमरावती शहरातील सर्व नागरिकांना शांतता राखण्याचे व कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवण्याचे आवाहन मा.डॉ.आरती सिह पोलीस आयुक्त अमरावती यांनी केलेले आहे.

कार्यालय पोलीस आयुक्त अमरावती

पोलीस निरीक्षक
विशेष शाखा , अमरावती